# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 18.05.2025** **वार- रविवार**

---

**तिरंगायात्रा**

ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर भारतीय सैन्य दलांच्या गौरवार्थ देशभरात तिरंगा यात्रा काढण्यात येत असून राज्यातही ठीकठिकणी काढण्यात येत असलेल्या या तिरंगा यंत्रांना मोठा प्रतिसाद मिळत आहे. पुण्यात आज संध्याकाळी पाच वाजता केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून तिरंगा यात्रेला सुरुवात झाली. भारतीय जनता पक्षाचे पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्यासह विद्यमान आमदार आणि माजी नगरसेवक यावेळी उपस्थित होते. पावसाच्या सरींच्या साक्षीनं उपस्थित मान्यवरांनी हातात तिरंगा ध्वज घेऊन भारत माता की जय आणि वंदे मातरम अशा घोषणा दिल्या.

**राजभाषा**

राजभाषा विभाग हिंदी भाषेच्या विकासासाठी कटिबद्ध आहे; या कामात राजभाषा प्रेमींच्या पाठबळाचीही आवश्यकता आहे, असं प्रतिपादन केंद्र सरकारच्या राजभाषा विभागाच्या संयुक्त सचिव डॉ. मीनाक्षी जौली यांनी नुकतंच पुण्यात केलं. दि ऑटोमोटिव रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया म्हणजेच ARAI इथं आयोजित राष्ट्रीय राजभाषा परिसंवादामध्ये त्या बोलत होत्या. वरिष्ठ हिंदी साहित्यकार डॉ.दामोदर खडसे , यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी आणि मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**शाळा**

पिंपरी-चिंचवड शहरातील 65 टक्के शाळांचं महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीनं ऑनलाईन मॅपिंग करण्यात आलं आहे. या जिओ मॅपिंगमुळे शाळेची सद्यस्थिती, स्वच्छतागृहांची अवस्था, शाळेचे बांधकाम, पायाभूत सुविधा यासह शाळांची इत्यंभूत माहिती एका क्लिकवर मिळणार आहे. केवळ महापालिकेच्याच नाही तर खाजगी, विनाअनुदानित आणि अनुदानित शाळांचेही मॅपिंग होत आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये 665 शाळा असून मोठ्या संख्येनं अधिकृत नसलेल्या बोगस शाळाही चालवल्या जात आहे. या मॅपिंगमुळे बोगस संस्थाचालकांना आणि शाळांना आळा बसणार असून अशा अनधिकृत शाळांची माहितीही पालकांना मिळणार आहे.

**जनजागृती**

देहू नगरपंचायत हद्दीतील प्राथमिक आरोग्य केंद्राच्यावतीनं डेंग्यू आजाराविषयी जनजागृती करण्यात आली.तसेच देहू गावात प्रत्येक गुरुवार दिवस कोरडा दिवस म्हणून पाळला जाणार आहे. या दिवशी सर्व पाण्याची भांडी रिकामी करून स्वच्छ धुऊन कोरडी करावीत असं वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितलं.

**रोजगारमेळावा**

करिअरमध्ये यशस्वी होण्यासाठी जिद्द,प्रामाणिकपणा, कष्ट करण्याची तयारी आणि प्रयत्नांमध्ये सातत्य ही चतुसूत्री युवा पिढीनं आत्मसात करावी असे आवाहन आमदार अतुल बेनके यांनी केलं.

जुन्नर इथल्या सह्याद्री महिला प्रतिष्ठान आणि यशस्वी अकॅडमी फॉर स्किल्स यांच्यावतीने आयोजित रोजगार मेळाव्याचं उद्घाटन करताना ते काल बोलत होते. या रोजगार मेळाव्यासाठी जुन्नर तालुक्यातल्या 400 हून अधिक युवक युवतींनी नोंदणी केल्याचं आयोजिका पूजाताई बुट्टे पाटील यांनी सांगितलं.

**जागतिकसंग्रहालयदिन**

जागतिक संग्रहालय दिनानिमित्त पुण्यातल्या ४० शालेय  विद्यार्थ्यांना ऐतिहासिक नानावाडा मधल्या स्वराज्य क्रांतिकारक संग्रहालयाची सफर घडविण्यात आली. समाज सुधारकांचं कार्य, स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास नवीन पिढीला समजावा म्हणून या उपक्रमाचं  आयोजन  करण्यात आल्याचं साईनाथ मंडळाचे अध्यक्ष पियूष शहा यांनी सांगितलं. सेनापती बापट रस्त्यावरच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय आणि स्मारकालाही आज अनेकांनी भेट दिली.

**संसदरत्न**

चेन्नई इथल्या 'प्राईम पॉईंट फौंडेशन'च्या वतीने देण्यात येणाऱ्या 'संसदिय लोकशाहीत प्रभावी सातत्यपूर्ण योगदान' या पुरस्कारासाठी खासदार सुप्रिया सुळे आणि  खासदार श्रीरंग बारणे यांची निवड करण्यात आली आहे.

**मेधापाटकर**

झोपडपट्टी पुनर्वसनासाठी पुण्यातल्या पौड रस्ता इथल्या  भीमनगरच्या रहिवाशांची सहमती नसताना देखील घरे खाली करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिलेली नोटीस मागे घ्यावी. भीमनगरवासीयांना आहे त्याच ठिकाणी घरे देऊन योग्य न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी जेष्ठ समाजसेविका मेधा पाटकर यांनी केली आहे.

**बाजारसमिती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून साधारण 80 ते 90 ट्रक फळभाज्यांची आवक झाली. गेल्या आठवड्यात झालेल्या पावसामुळे आवक घटल्याने फ्लॉवर, सिमला

मिरची, मटार आणि टोमॅटो महागले आहेत. तर मेथी, पुदिना, अंबाडी यांचे भाव खाली आले आहेत. डाळिंब लिंबू आणि खरबुजाचे भाव घटले आहेत. तर फुल बाजारात आवक आणि मागणी स्थिर असल्यानं भाव टिकून आहेत.

**<u>पिकनुकसान</u>**

गेल्या दहा बारा दिवसांपासून राज्यात सुरू असलेल्या पावसामुळं २३ जिल्ह्यांमधील २३ हजार ३३१ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. त्यात प्रामुख्याने भाजीपाला, फळपिके तसेच उन्हाळी हंगामातील पिकांचा समावेश आहे. महसूल आणि कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांनी नुकसनाचे पंचनामे करण्यास सुरुवात केली असून याचा सविस्तर अहवाल लवकरच राज्य सरकारला सादर केला जाईल.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज दुपारनंतर पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. या पावसानं हवेतला गारवा वाढला आहे. उद्याही सोसाट्याच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांतसह , नमस्कार.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**